Business Standard
The Smart Investor
MUMBAI | TUESDAY, 9 JULY 2019
WWW.SMARTINVESTOR.IN FOR INFORMED DECISION MAKING

**HIKAL**

**HIKAL LTD**

**Regd. Office:** 717/718, 7th Floor, Maker Chamber V, Nariman Point, Mumbai - 400 021.
**CIN:** L24200MH1988PTC048028
**Tel No.:** 022 3097 3100 **Fax:** 022 2757 4277
**Email:** secretarial@hikal.com **Website:** www.hikal.com

## NOTICE OF 31ST AGM, E VOTING FOR TRANSACTING BUSINESS & BOOK CLOSURE

Notice is hereby given that the 31st (Thirty-First) Annual General Meeting ("AGM") of the Company will be held on Thursday, August 1, 2019 at 3.30 p.m. at Centrum Hall 'A', 1st Floor, Centre 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai 400 005, to transact the businesses as set out in the Notice convening the 31st AGM.

The Notice of AGM setting out the Ordinary and Special Business to be transacted at the Meeting along with the Attendance Slip, Proxy Form, Ballot Form and the Annual Report of the Company of the Financial Year 2018-19 which inter-alia, comprise of Audited Financial Statement and Audited Consolidated Financial Statement of the Company for Financial Year ended March 31, 2019 and the Reports of the Board of Directors and Auditors thereon have been sent to the Members by email to those Members whose email-id is registered with the Company / Depositories and dispatched in Physical Form to all the other Members individually at the address registered with the Company / Registrar. The physical dispatch of Notice and Annual Report and email transmission is completed on July 8, 2019.

Notice and Annual Report is also available on web site www.hikal.com under investors section. The final dividend of ₹ 1.20 per share (including interim dividend of ₹ 0.60 per share) recommended by the Board, and if approved by the Members at the ensuing AGM, will be paid to the Members whose names appear on the Register of Members as on August 1, 2019 and to the Beneficial Owners of the shares as on July 24, 2019, as per the details furnished by the Depositories for this purpose.

As per Section 108 of the Companies Act, 2013 read with Rule 20 of the Companies (Management and Administration) Rules, 2014, as amended from time to time and Regulation 44 of Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, the Company offers the e-voting facility to the Members to cast their votes by electronic means on all the resolutions set out in the Notice convening the AGM.

The details required to be given under the Companies Act, 2013 and Rules made thereunder are as follows:

1. Mr. Ashish C Bhatt, Practicing Company Secretary (Membership No. ACS 4650) has been appointed as the Scrutinizer to scrutinize the e-voting process in a fair and transparent manner.
2. The Company has engaged the services of Central Depository Services (India) Limited (CDSL) to provide electronic voting facility to the Members of the Company.
3. The voting period begins at 9.00 a.m. IST on Monday, July 29, 2019 and ends at 5.00 p.m. IST on Wednesday, July 31, 2019. During this period the Members of the Company holding shares either in physical form or in dematerialized mode (as on the cut-off date which is July 25, 2019), may cast their votes electronically. The voting rights of Members shall be in proportion to their shares in the paid-up equity share capital of the Company as on this cut- off date.
4. The e-voting module shall be disabled by CDSL for voting after 5.00 p.m. IST on Wednesday, July 31, 2019 and voting shall not be allowed beyond the said timings.
5. Members who do not have e-voting facility can take the benefit of Ballot Form sent along with the Notice. Duly completed Ballot Form should reach the Scrutinizer not later than 5.00 p.m. IST on Wednesday, July 31, 2019. Ballot Form received after 5.00 p.m. IST on July 31, 2019 will be strictly treated as if the reply from the Members has not been received.
6. A member can opt for only one mode of voting i.e. either through e-voting or by Ballot. If a Member casts votes by both modes, then voting done through e-voting shall prevail and Ballot shall be treated as invalid.
7. The voting rights of Members have been reckoned as on July 25, 2019, being the cut-off date for the purpose of e-voting. Members of the Company holding shares either in physical or in dematerialized form, as on the cut off date, may cast their votes.
8. Details of the manner of casting of votes are provided in the Notice of AGM posted on the website of the Company viz www.hikal.com and on the website of the CDSL viz www.evotingindia.com
9. Facility of voting at AGM is also provided. Members who have not cast their vote by e-voting or ballot form through post can vote at AGM. Members who have cast the vote by e-voting or ballot form through post can attend the AGM but shall not be allowed to vote again.
10. The results shall be declared within 48 hours of end of e-voting period. The Results declared along with Scrutinizers Report shall be placed on the Company's website www.hikal.com and communicated to the BSE Limited and National Stock Exchange of India Limited, on which shares of the Company are listed.
11. Voting exercised on photo copy of ballot form will not be considered while counting the votes. Members can write to the Company / Registrars and Share Transfer Agents for duplicate Ballot form, if required.
12. Any person who acquires shares of the Company and become a Member of the Company after dispatch of Notice of AGM and holding shares as of the cut-off date i.e. July 25, 2019, may obtain user ID and Password by sending a request at helpdesk.evoting@cdslindia.com or contact at 18002005533. However, Members already registered with CDSL for remote e-voting, can use their existing User ID and Password for this purpose.
13. In case you have any queries or issues regarding e-voting, you may refer the Frequently Asked Questions ("FAQs") and e-voting manual available at www.evotingindia.com, under help section or write an email to helpdesk.evoting@cdslindia.com or contact Mr. Devanand Dalvi, General Manager of Universal Capital Securities Private Limited at 21, Shakil Niwas, Opp. Satya Sai Baba Mandir, Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai - 400 093 or they may also request at their e-mail: hikal@unisec.in or at Tel No.: 91-22-2820 7203/04/05, Fax: 91-22-2820 7207.

Notice is further given that pursuant to the provisions of Section 91 of the Companies Act, 2013 read with the Rule 10 of the Companies (Management and Administration) Rules, 2014 and Regulation 42 of Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, the Register of Beneficial Owners, Register of Members and Share Transfer Books of the Company will remain closed from Thursday, July 25, 2019 to Thursday, August 1, 2019 (both days inclusive).

By Order of the Board
Sham Wahalekar
Company Secretary

Mumbai
July 8, 2019

मुंबई, मंगळवार, ९ जुलै २०१९ ७

देशविदेश

सकाळ

HiKAL

# हायकल लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय :** ७१७/७१८, ७ वा मजला, मेकर चेंबर ५, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१.

**सीआयएन :** L24200MH1988PTC048028

**दूर. क्र. :** ०२२ - ३०९७ ३१०० **फॅक्स :** ०२२ - २७५७ ४२७७

**ई-मेल :** secretarial@hikal.com **वेबसाइट :** www.hikal.com

## विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी ३१ वी एजीएम, ई-मतदानाची सूचना व बुक क्लोजर

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनीची ३१ वी (एकतिसावी) वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) गुरुवार, दि. १ ऑगस्ट, २०१९ रोजी दु. ३.३० वाजता सेंट्रम हॉल, ए , १ ला मजला, सेंटर १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५ येथे ३१ वी एजीएम आयोजित करणाऱ्या सूचनेत विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात येत आहे.

सभेमध्ये विचारविनिमय करावयाच्या सामान्य व विशेष विषय विहित असलेली एजीएमची सूचना, उपस्थिती पत्र, प्रतिनिधित्व फॉर्म, टपाली मतदान फॉर्म तसेच वित्तीय वर्ष २०१८-१९ करिताचा कंपनीचा वार्षिक अहवाल ज्यामध्ये अन्य बाबींबरोबरच दि. ३१ मार्च, २०१९ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिताचा कंपनीचा लेखापरीक्षित वित्तीय अहवाल व लेखापरीक्षित एकत्रित वित्तीय अहवालाचा समावेश असेल, तसेच त्यावरील संचालक मंडळ व लेखापरीक्षकांचा अहवाल आदी दस्तावेज ज्या सभासदांचे ई-मेल आयडीज् कंपनी/डिपॉझिटरीज्कडे नोंद असतील त्यांना ई-मेलद्वारे व अन्य सर्व सभासदांना कंपनी/रजिस्ट्रारकडे नोंद असलेल्या पत्त्यांवर व्यक्तिगत स्वरूपात पाठवण्यात आलेले आहेत. सूचना व वार्षिक अहवालाची प्रत्यक्ष पाठवणी तसेच ई-मेलद्वारे पाठवणी दि. ८ जुलै, २०१९ रोजी पूर्ण करण्यात आली आहे.

सूचना व वार्षिक अहवाल वेबसाइट www.hikal.com वरही investors section अंतर्गत उपलब्ध आहे. संचालक मंडळाद्वारे प्रतिशेअर रु. १.२० चा अंतिम लाभांशाची (यामध्ये प्रतिशेअर रु. ०.६० चा अंतरिम लाभांश अंतर्भूत) शिफारस केली आहे व आगामी एजीएममध्ये सभासदांद्वारे त्यास मंजुरी देण्यात आल्यास, याकरिता डिपॉझिटरीजद्वारे सादर करण्यात आलेल्या तपशिलानुसार, दि. १ ऑगस्ट, २०१९ रोजीनुसार सभासदांच्या रजिस्टरमध्ये नाव नोंद असलेल्या व दि. २४ जुलै, २०१९ रोजीनुसार शेअर्सचे लाभार्थी मालक असलेल्या सभासदांना तो प्रदान करण्यात येईल.

कंपन्या कायदा, २०१३ चे अनुच्छेद १०८ सहवाचन कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ चे नियम २०, वेळोवेळी सुधारित केल्यानुसार तसेच भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ४४ अंतर्गत एजीएम आयोजित करणाऱ्या सूचनेत विहित केलेल्या सर्व ठरावांवर इलेक्ट्रॉनिक स्वरूपात मत देता येण्यासाठी कंपनी आपल्या सभासदांना ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून देत आहे.

कंपन्या कायदा, २०१३ व त्याअंतर्गत संस्थापित नियमांतर्गत द्यावयाचा आवश्यक तपशील खालीलप्रमाणे आहे :

१. ई-मतदान प्रक्रियेचे निःपक्ष व पारदर्शक पद्धतीने परीनिरीक्षण करण्यासाठी श्री. आशिष सी. भट्ट, कार्यरत कंपनी सचिव (सदस्यत्व क्र. एसीएस ४६५०) यांची परीनिरीक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

२. कंपनीच्या सभासदांना इलेक्ट्रॉनिक मतदान सुविधा पुरविण्यासाठी कंपनीने सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल)ची सेवा नेमली आहे.

३. मतदानाचा कालावधी सोमवार, दि. २९ जुलै, २०१९ रोजी स. ९.०० वाजता (भा. प्र. वे.) सुरू होत असून बुधवार, दि. ३१ जुलै, २०१९ रोजी सायं. ५.०० वा. (भा. प्र. वे.) संपेल. सदर कालावधीदरम्यान प्रत्यक्ष स्वरूपात किंवा डीमटेरियलाइज्ड् स्वरूपात (निर्धारित अंतिम तारीख अर्थात दि. २५ जुलै, २०१९ रोजीनुसार) भागधारक असलेले कंपनीचे सभासद त्यांची मते इलेक्ट्रॉनिक स्वरूपात देऊ शकतील. निर्धारित अंतिम तारखेनुसार कंपनीच्या प्रदानित समभाग भांडवलामधील आपल्या शेअर्सच्या प्रमाणानुसार सभासदाचे मतदान हक्क गणले जातील.

४. बुधवार, दि. ३१ जुलै, २०१९ रोजी सायं. ५.०० (भा. प्र. वे.) पश्चात सीडीएसएलद्वारे ई-मतदानाचे मोड्युल अकार्यरत करण्यात येईल व सदर वेळेपश्चात मतदानास परवानगी नसेल.

५. ज्या सभासदांकडे ई-मतदान सुविधा नसेल ते सूचनेसमवेत पाठवलेल्या टपाली मतदान फॉर्मचा लाभ घेऊ शकतील. भरलेले टपाली मतदान फॉर्म परीनिरीक्षकांकडे बुधवार, दि. ३१ जुलै, २०१९ रोजी सायं. ५.०० (भा. प्र. वे.) वाजेपर्यंत पोहोचावेत. दि. ३१ जुलै, २०१९ सायं. ५.०० (भा. प्र. वे.) वाजल्यानंतर प्राप्त टपाली मतदान फॉर्मच्या संदर्भात सभासदांकडून प्रतिसाद प्राप्त झाला नाही असे समजण्यात येईल.

६. सभासद मतदानाचा केवळ एकच प्रकार अर्थात ई-मतदान वा टपाली मतदानाद्वारे मतदानाचा पर्याय स्वीकारू शकतील. सभासदाने दोन्ही प्रकारे मत दिल्यास ई-मतदानाद्वारे दिलेले मतदान वैध ठरेल व मतपत्रिकेद्वारे दिलेले मत अवैध ठरेल.

७. ई-मतदानाकरिताची निर्धारित अंतिम तारीख अर्थात दि. २५ जुलै, २०१९ रोजीनुसार सभासदांचा मतदान हक्क गणला जाईल. निर्धारित अंतिम तारखेनुसार प्रत्यक्ष स्वरूपात किंवा डीमटेरियलाइज्ड् स्वरूपात भागधारक असलेले कंपनीचे सभासद त्यांची मते देऊ शकतील.

८. मते देण्याच्या प्रकाराचा तपशील कंपनीची वेबसाइट www.hikal.com वर व सीडीएसएलची वेबसाइट www.evotingindia.com वरही प्रदर्शित करण्यात आलेल्या एजीएमच्या सूचनेत देण्यात आलेला आहे.

९. एजीएमच्या ठिकाणीसुद्धा मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. ज्या सभासदांना ई-मतदानाद्वारे किंवा टपाली मतदानाद्वारे त्यांचे मत दिलेले नसेल ते एजीएममध्ये मत देऊ शकतील. ज्या सभासदांनी ई-मतदान वा टपाली मतदानाद्वारे मत दिलेले असेल ते एजीएममध्ये उपस्थित राहू शकतील, परंतु त्यांना पुन्हा मत देता येणार नाही.

१०. ई-मतदान कालावधी संपल्यानंतर ४८ तासांच्या आत निकाल घोषित करण्यात येईल. घोषित झालेला निकाल, परीनिरीक्षकांच्या अहवालासमवेत कंपनीची वेबसाइट www.hikal.com वर प्रदर्शित करण्यात येईल तसेच तो कंपनीचे शेअर्स सूचिबद्ध असलेल्या बीएसई लिमिटेड व नॅशनल स्टॅक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडलाही कळविण्यात येईल.

११. मतगणनेच्या वेळेस टपाली मतदान फॉर्मच्या फोटोकॉपीवरून दिलेले मत विचारात घेतले जाणार नाही. आवश्यकता असल्यास, ड्युप्लिकेट टपाली मतदान फॉर्मकरिता सभासद कंपनी/रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजंट्सना लिहू शकतील.

१२. एखाद्या व्यक्तीने एजीएमच्या सूचनेच्या पाठवणीपश्चात कंपनीचे शेअर्स संपादित केलेले असतील व कंपनीची सभासद बनली असल्यास व निर्धारित अंतिम तारीख अर्थात दि. २५ जुलै, २०१९ रोजीनुसार भागधारक असल्यास सदर व्यक्ती helpdesk.evoting@cdslindia.com येथे विनंती पाठवून किंवा १८००२००५५३३ वर संपर्क साधून लॉग इन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकेल. तथापि, परोक्ष ई-मतदानासाठी यापूर्वीच ते सीडीएसएलकडे नोंदणीकृत असल्यास याकरिता ते विद्यमान युजर आयडी व पासवर्ड वापरू शकतील.

१३. ई-मतदानासंदर्भात तुम्हाला काही विचारणा वा शंका असल्यास तुम्ही www.evotingindia.com वर help section अंतर्गत उपलब्ध Frequently Asked Questions (FAQs) व e-voting manual पाहू शकता किंवा helpdesk.evoting@cdslindia.com येथे ई-मेल लिहू शकता किंवा श्री. देवानंद दळवी, युनिव्हर्सल कॅपिटल सीक्युरिटीज प्रायव्हेट लिमिटेडचे महाव्यवस्थापक, पत्ता २१, शकील निवास, सत्यसाईबाबा मंदिरासमोर, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३ येथेही संपर्क साधू शकता किंवा त्यांना ई-मेल hikal@nuisec.in वरही विनंती पाठवू शकता किंवा दूर. क्र. ९१-२२-२८२० ७२०३ / ०४ / ०५, फॅक्स : ९१ - २२ - २८२० ७२०७ वर संपर्क साधू शकता.

कंपन्या कायदा, २०१३ चे अनुच्छेद ९१ च्या तरतुदी सहवाचन कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ चे नियम १० व भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन,२०१५चे विनियमन ४२ अंतर्गत पुढे सूचना देण्यात येत आहे की, कंपनीचे लाभार्थी मालकांचे रजिस्टर, सभासदांचे रजिस्टर व शेअर ट्रान्सफर बुक्स, गुरुवार, दि. २५ जुलै, २०१९ ते गुरुवार, दि. १ ऑगस्ट, २०१९ दरम्यान (दोन्ही दिवस समाविष्ट) बंद राहतील.

मंडळाच्या आदेशाद्वारे,
श्याम वहाळेकर
कंपनी सचिव

मुंबई
८ जुलै, २०१९